


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७३९. वा | सोमवार | दि. १५ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मतदारसंघात महायुतीची एवढी ताकद असल्याने प्रतापराव जाधव चौकार मारणारच...






जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रहितासाठी पुन्हा एकदा नरेंद्र मोदींना देशाचे पंतप्रधान करायचे आहे. अबकी बार ४०० पार मध्ये प्रतापराव जाधव नंबर एकवर पाहिजेत, ही निवडणूक साधीसुधी निवडणूक नाही, ही निवडणूक देशाची निवडणूक आहे. आता हॅट्रिक झाली आहे, मतदारसंघात महायुतीची एवढी ताकद असल्याने प्रतापराव जाधव चौकार मारणारच आहे असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या मेळाव्याची रूपांतर अक्षरशः जाहीर सभेचे झाले, तर गुलाबराव पाटील यांनी प्रतापराव हे २ लाखाच्या वर मताधिक्याने निवडून येतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला. बुलढाणा शहरातील धाड नाका येथे आज १४ एप्रिल रोजी आयोजित महायुतीच्या पदाधिकारी मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी मंचावर ना. गुलाबराव पाटील, खा. प्रतापराव जाधव, आ. डॉ. राजेंद्र शिंगणे, आ. संजय कुटे, आ. संजय रायमुलकर, आ. आकाश फुंडकर, आ. श्वेताताई महाले, आ. संजय गायकवाड, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, बळीराम मापारी, माजी आ. तोताराम कायंदे, माजी आ. धृपदराव सावळे, माजी आ.डॉ. शशिकांत खेडेकर, भाजपचे योगेंद्र गोडे, मनसेचे विठ्ठल लोखंडकार, आरपीआयचे विजय गवई, भाजपचे प्रकाशबुवा जवंजाळ यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. संतश्रेष्ठ गजानन महाराजांचे नाव घेऊन त्यांनी भाषणाला सुरुवात केली. यावेळी त्यांनी आईसाहेब जिजाऊं, जयंतीदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही स्मरण केले. ज्याच्याकडे बहूमत तोच खरा पक्ष असतो, बाळासाहेबांचा धनुष्यबाण आपल्याकडेच आहे. त्यामुळे आपली खरी शिवसेना आहे असे ते म्हणाले. मोदी सरकार संविधान बदलणार आहे असा आरोप विरोधक करतात. मात्र जी काँग्रेस हा आरोप करते त्याच काँग्रेसने बाबासाहेबांचा पराभव केल्याचे ते म्हणाले. जोपर्यंत चंद्र आणि प्रतापराव चौकार मारणार असल्याचा केला विश्वास व्यक्त गुलाबराव म्हणाले - २ लाखाच्या लीडने येणार प्रतापरावसूर्य आहे तोपर्यंत बाबासाहेबांचे संविधान कुणीही बदलणार नाही. ना. गुलाबराव पाटील म्हणाले यावेळी बोलताना म्हणाले की, प्रतापराव २ लाख मतांनी विजयी होतील. कार्यकर्त्यांनो शांत राहू नका, जोमाने कामाला लगा. ही निवडणूक तुमच्या आमच्या प्रतिष्ठेची नाही, देशातल्या ५४४ जागेवर नरेंद्र मोदी उमेदवार आहेत असे समजून मतदान करा. खा. प्रतापराव जाधव म्हणाले की, मागच्या तीन निवडणुकांत अतिशय मेहनत घेऊन आपल्याला खासदार म्हणून पाठवल्याबद्दल खा. प्रतापराव जाधव यांनी मतदारांचे आभार मानले. १५ वर्षात केलेल्या कामांचा लेखाजोखा आपण मतदारांपर्यंत पोहचत असल्याचे ते म्हणाले. पहिली ५ वर्षे मी विरोधातील खासदार होतो, २०१४ पासून तर २०२४ पर्यंत बुलडाण्यात अनेक विकासकामे झाली. आधी फक्त एक नॅशनल हायवे होता त्याची अवस्थाही बिकट होती, दररोज अपघात होत होते. मात्र गेल्या १० वर्षात जिल्ह्यातील सर्वच महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर झाल्याचे खा. जाधव म्हणाले. या १० वर्षात बुलडाणा जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले आहे. शेतकऱ्यांची जमीन पाण्याखाली यावी म्हणून नदीजोड प्रकल्पाची मागणी आम्ही करत होतो. आमच्या प्रयत्नांना यश आले मागच्या अधिवेशनात राज्य सरकारने वैनगंगा, पैनगंगा, नळगंगा ( प्रकल्पासाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला, ८८ हजार कोटी रुपयांचा असा हा प्रकल्प आहे. जिल्ह्यातून ८८ किमी जाणारा समृध्दी महामार्ग पूर्ण झाला आहे. मुंबई. नागपूरचे अंतर कमी झाले. शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीसाठी, दवाखाण्यासाठी त्याचा फायदा होत असल्याचे खा. जाधव म्हणाले. आपल्याकडे सांगण्यासारखी शेकडो कामे आहेत. मतदारसंघात ६ आमदार आपले आहेत, मात्र तरीही गाफील राहू नका, मतदानाची टक्केवारी वाढवा. विजय आपला निश्चित आहे, लाखांच्या फरकाने आपण निवडून येऊ, असे खा. जाधव म्हणाले. यावेळी बोलताना आ. डॉ. राजेंद्र शिंगणे म्हणाले की, देशाच्या दृष्टिकोनातून ही महत्वाची निवडणूक आहे. देशासमोरची आव्हाने कोण पेलू शकत याचा विचार केला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकमेव उत्तर समोर येत, त्यामुळे खा. प्रतापराव जाधव यांना प्रचंड बहुमताने विजयी करून मोदींचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. आ. संजय कुटे यांनी खा. प्रतापराव जाधवांना गेल्या तीन निवडणुकांपेक्षा सर्वाधिक मताधिक्य द्यायचे आवाहन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवायचे आहे, ४०० पारच्या नाऱ्यात बुलडाण्याचे खासदार असले पाहिजे. आपली लढाई महाविकास आघाडीसोबत असल्याचे आ. कुटे म्हणाले.

# २ हजार ८६३ ज्येष्ठ, दिव्यांग करणार घरूनच मतदान....

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि सर्व दिव्यांग व्यक्तींनी मागणी नोंदविल्यानुसार घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्ह्यात २ हजार १७१ ज्येष्ठ नागरिक आणि ६९२ दिव्यांग असे एकूण २ हजार ८६३ मतदार घरून मतदान करणार आहेत. हे मतदान मतपत्रिकेद्वारे होणार असून लोकसभा मतदारसंघात १०१ पथक प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन मतदान करून घेणार आहे. जिल्ह्यात दि.२१ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान सदर मतदान प्रक्रिया होणार आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ११२ ज्येष्ठ नागरिक, ८४ दिव्यांग असे १९६, चिखली विधानसभा मतदारसंघात ३१८ ज्येष्ठ नागरिक, ९६ दिव्यांग असे ४१४, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ५३९ ज्येष्ठ नागरिक, ८९ दिव्यांग असे ६२८, मेहकर विधानसभा मतदारसंघात ८२० ज्येष्ठ नागरिक, २८३ दिव्यांग असे १ हजार १०३, खामगाव विधानसभा मतदारसंघात १२० ज्येष्ठ नागरिक, ८३ दिव्यांग असे २०३, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात २६२ ज्येष्ठ नागरिक, ५७ दिव्यांग असे ३१९, असे २ हजार १७१ आणि दिव्यांग ६९२ असे एकूण २ हजार ८६३ मतदार घरून मतदान करणार आहे. प्रशासनाने दिव्यांग आणि ज्येष्ठांच्या मतदानाची तयारी केली आहे. बुलढाणा मतदारसंघ येथे १९६ मतदारांसाठी १० पथक, चिखली येथे ४१४ मतदारांसाठी २० पथक, सिंदखेड राजात ६२८ मतदारांसाठी १९ पथक, मेहकरात ११०३ मतदारांसाठी ३२ पथक, खामगाव येथे २०३ मतदारांसाठी १० पथक, जळगाव जामोद येथे ३१९ मतदारांसाठी १० पथक स्थापन केले.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आयोगामार्फत मतदारांसाठी उपयोगी विविध प्रणाली

जनसंचलन/बुलढाणा

लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता शनिवार, दि. १६ मार्च २०२४ रोजी लागू झाली आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तर मंगळवार, दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. मतदाराना निवडणूक संदर्भातील तक्रार नोंदविण्याची प्रणाली, उमेदवारांवरील गुन्हेविषयक माहिती, मतदारांना मतदान केंद्र व नाव नोंदणी अशा विविध बाबींची माहिती मतदारांना व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने बहुउपयोगी विविध प्रणाली सुरु केली आहे. सी-व्हीजील सिटीजन ॲप सी-व्हीजील ॲप हे भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेले मोबाईल अप्लीकेशन आहे. सदर ॲप नागरिकांना निवडणुकीदरम्यान आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास तक्रार नोंदविण्यास मदत करते. अँड्रॉइड आणि आयओएस प्रणालीवर हे ॲप उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींची प्रगतीही पाहू शकतात. केवायसी ॲप हे भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेले मोबाईल ॲप्लिकेशन आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पूर्व वृत्ताबद्दल माहिती मिळते. केवायसी ॲप वापरण्यासाठी मतदारांना नामांकनाची यादी पाहण्यासाठी निवडणुकीचा प्रकार आणि मतदारसंघाचे नाव निवडणे आवश्यक आहे. तसेच नावाने उमेदवार शोधता येतो. या माहितीमध्ये उमेदवारावर दाखल केलेल्या कोणत्याही फौजदारी खटल्यांचा तपशील, त्या प्रकरणांची स्थिती आणि गुन्ह्यांचे स्वरूप यांची माहिती देण्यात आली आहे.

व्होटर हेल्पलाईन ॲपला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या या ॲपने मतदारांशी संबंधित सेवांमध्ये प्रवेश करण्याच्या आणि त्यात सहभागी होण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली आहे. नवीन मतदारांची नोंदणी, मतदारयादीतील लोकसंख्येच्या तपशिलांची दुरुस्ती, मतदार यादीतील नावाचा शोध आणि इतर निवडणूक-संबंधित सेवांपासून या ॲपने ईसीआयला नागरिकांशी जोडण्याची प्रक्रिया सुव्यवस्थित केली आहे, ती अधिक सोयीस्कर आणि कार्यक्षम बनवली आहे. आरटीआय ऑनलाईन पोर्टल भारताच्या निवडणूक आयोगाने ऑनलाईन पोर्टलची संकल्पना केली आहे. यातून नागरिक माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्ज दाखल करता येऊ शकते. प्रथम थेट निवडणूक आयोगाकडे अपील करू शकतात. या आरटीआय ऑनलाईन पोर्टलने नागरिकांना हवी असलेली माहिती निवडणूक आयोगाकडून मिळवण्याची सोय केली आहे. विद्यमान आरटीआय फाइलिंग आणि प्रतिसाद प्रक्रिया स्वयंचलित आणि सुव्यवस्थित करण्यासाठी हा उपक्रम आहे. या व्यतिरिक्त पोर्टलवर पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरटीआय ऑनलाईन पोर्टलमध्ये दोन मुख्य मॉड्यूल आहेत, पहिले मॉड्यूल नागरिक, तर दुसरे मॉड्यूल निवडणूक आयोग कर्मचाऱ्यांसाठी आहे. नॅशनल ग्रीव्हिएन्स सर्व्हिस पोर्टलहे पोर्टल निवडणूक अधिकाऱ्यांच्या तक्रारी हाताळण्यासाठी एकाच इंटरफेसवर तक्रार समर्थनासाठी वेब-आधारीत उपाय आहे. निवडणूक संबंधित आणि गैर-निवडणूक-संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी निवडणूक आयोगाला मदत करण्यात नॅशनल ग्रीव्हिएन्स सर्व्हिस पोर्टल महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या पोर्टलमुळे नागरिकांना तक्रारी नोंदवणे सोपे झाले आहे. तक्रारींची तातडीने चौकशी केली जाईल याची खात्री करण्यात मदत होते. नागरिक त्यांचा मोबाईल नंबर वरून पोर्टलवर नोंदणी करू शकतात आणि त्यांचे प्रोफाइल तयार करू शकतात. हे पोर्टल एखाद्या नागरिकाने त्याच्या प्रोफाइलमध्ये नोंदवलेल्या सर्व तक्रारींची नोंद ठेवते.

उमेदवार शपथपत्र पोर्टल हे एन्कोरचा एक भाग आहे. जे नागरिकांना निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामांकनांची संपूर्ण यादी पाहण्याची परवानगी देते. उमेदवारांना जाणून घेण्यासाठी नागरिकांना मदत करण्यासाठी, रिटर्निंग ऑफिसर जेव्हा डेटा प्रविष्ट करतात तेव्हा फोटो आणि शपथपत्रासह संपूर्ण उमेदवाराचे प्रोफाइल सार्वजनिक केले जाते. नामनिर्देशनासोबत सादर केलेले




प्रतिज्ञापत्र सिस्टममध्ये अपलोड केले जाते आणि पोर्टल वापरून कोणताही नागरिक ते पाहू आणि डाउनलोड करू शकतो.

मतदार यादीत तुमचे नाव शोधा ही सेवा भारत निवडणूक आयोगाने दिली आहे. वापरकर्ते त्यांच्या राज्याचे नाव निवडून त्यांचे नाव शोधू शकतात. मतदारांना त्यांचे मतदान केंद्र, मतदान केंद्र क्रमांक, तसेच मतदारयादीमधील अनुक्रमांक नावे शोधण्याकरीता उपयोगी येणारी प्रणाली आहे. नाव, आडनाव, विधानसभा मतदारसंघाचे नाव, लिंग आदी तपशील देखील शोधण्यासाठी आवश्यक आहेत. जिल्हानिहाय शोधण्याचे पर्याय देखील उपलब्ध आहे.

हे भारत निवडणूक आयोगाच्या प्रसिद्ध अनुप्रयोगांपैकी एक आहे. जे प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजे मतदानाची टक्केवारी प्रदर्शित करण्यासाठी इन-हाउस विकसित मोबाइल ॲप आहे. हे ॲप डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. मतदार मतदान ॲप अंदाजे मतदान टक्केवारी मोजण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सर्व्हरवरील रिअल-टाइम डेटा वापरते. ॲप वापरकर्त्यांना निवडणुकीचा प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार डेटा फिल्टर करण्याची परवानगी देतो. हा अप्लिकेशन फक्त विधानसभा, संसदीय आणि पोटनिवडणुकीच्या काळात सक्रिय होते.

भारत निवडणूक आयोग दिव्यांगासाठी सेवा देऊन मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी काम करीत आहे. एका नवीन उपक्रमांतर्गत दिव्यांगांना त्यांचे आवश्यक तपशील निवडणूक आयोगासोबत खास डिझाईन केलेल्या ॲपद्वारे शेअर करणे आवश्यक आहे. नगारिक हे ॲप सहजपणे डाउनलोड करू शकतात.

## श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान च्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

जनसंचलन/बुलडाणा

रविवार रोजी सकाळी १० वा महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणासाठी सर्वस्व गमावलेला असतो शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणिव निर्माण होते त्यामुळेच शिक्षण हे वाघिणी चे दूध आहे ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी ठासून म्हणायचे असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष गणेश भाऊ माने यांनी कार्यक्रम प्रसंगी केले सर्व प्रथम श्री सदगुरू एकनाथ महाराज सार्वजनिक वाचनालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्या माल्यार्पण करून पुजन करून अभिवादन केले नंतर रेल्वे स्टेशन समोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या ला माल्यार्पण करून पुजन करून अभिवादन करण्यात आले या वेळी गगन भेदी घोषणा देवुन जय घोष करण्यात आला. या प्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष माजी नगराध्यक्ष गणेशभाऊ माने,वैभव डवरे,रामभाऊ बोन्द्रे, रमाकांत गलांडे, नरेंद्र मावळे,सुभाष शेळके, महेंद्र पाठक,डि आर गलांडे,नरेंद्र पुरोहित, चंदाबाबा रेठेकर, वाचनालयाचे अध्यक्ष विकास चव्हाण,संजय नळकांडे,देविदास शर्मा,आकाश खरपाडे,नागोराव



अवतार,स्वप्नील शहा,दिपक बागडे, लालाजी सांगळे, चंद्रकांत शिंदे,सूरेश जांबळे,अनिल मापारी, मीनाताई मापारी,व शिव प्रतिष्ठान,श्री सदगुरू एकनाथ महाराज सार्वजनिक वाचनालय,श्री हनुमान व्यायाम शाळा,श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळ चे सर्व पदाधिकारी , संचालक,सदस्य,उपस्थित होते. अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख देविदास शर्मा यांनी दिली आहे

## डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती भीम पाळणा म्हणत केली पारंपारिक पद्धतीने साजरी..

जनसंचलन/बुलडाणा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३व्या जयंती निमित्त बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौकातील गांधी भवन मध्ये पारंपारिक पद्धतीने भीम पाळणा म्हणत साजरी करण्यात आली आहे.. यावेळी महार बटालियनच्या वतीने धम्म ध्वज फडकवत मानवंदना देण्यात आली आहे.. तर महिलांच्या वतीने मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.. तसेच चौकामध्ये महिलांच्यावतीने ढोल ताशे वाजवत आनंद व्यक्त करण्यात आला आहे.. यावेळी बुलढाण्याचे शिवसेना आ. संजय गायकवाड, मा.आ. विजयराज शिंदे, सत्यशोधक चित्रपट निर्माते सुनील शेळके,प्रदेश काँग्रेसचे सचिव जयश्री शेळके,बुलढाणा नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे आणि उपमुख्य अधिकारी गणेश साठे यांच्यासह मोठ्या संख्येने भीम अनुयायी उपस्थित होते तर संध्याकाळी सात वाजता भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून या मिरवणूकीमध्ये बुलढाणा करांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉक्टर बाबासाहेब सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल कासारे यांनी केले आहे..

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १२ तास वाचन उपक्रम संपन्न



जनसंचलन/बुलढाणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतासह जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी होत असते. जगभर त्यांची जयंती मोठ्या आनंदाने व विविध पद्धतीने साजरी होत असताना ती नाचून साजरी करण्याकडे आजच्या पिढीचा कल असतो. मात्र ज्याकडे आजच्या विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होत आहे असे वाचून जयंती साजरी करण्यात यावी याउद्देशाने स्थानिक जिजामाता महाविद्यालयामध्ये १३ एप्रिल २०२४ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त ङ्ख१२ तास वाचनङ्ख या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे यांच्या मार्गदर्शनात ग्रंथालय विभाग, भौतिकशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये सकाळी ७ ते संध्याकाळी ७ असे १२ तास विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी वाचन केले. ग्रंथालयाच्या वाचन कक्षात दिवसभर वाचन केल्याचा आनंद विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रियेमध्ये व्यक्त केला. या १२ तास वाचन उपक्रमामध्ये महाविद्यालयाच्या ५० पेक्षा जास्त विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. उपक्रमाचे उद्घाटन वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ. सुरेश गवई यांच्या हस्ते करण्यात आले होते. दरम्यान महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना अल्पपोहार व चहापानाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली होती.

या उपक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ. सुरेश गवई, महाविद्यालयाच्या आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. सुबोध चिंचोले, ग्रंथपाल डॉ. रविकांत महिंदकर, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास पहुरकर, कला शाखाप्रमुख डॉ. जे. जे. जाधव, प्रा. संजय साळवे, विनोद आराख, एमसीव्हीसी विभागाचे प्रा. नितीन पाटील, श्री युवराज सुरडकर, श्री राजपूत, श्री अशोक जाधव, तसेच इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. सोबतच दि. १४ एप्रिल २०२४ रोजी महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत काम करणार जनतेने संधी द्यावी ; भीमवंदना यात्रेत संदीप शेळकेंचे प्रतिपादन



जनसंचलन/ शेगाव

माझ्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. मी डॉ. बाबासाहेबांचा अनुयायी आहे. जनतेने लोकसभेची संधी दिली तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या पद्धतीने काम करेल, असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी केले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी पातुर्डा ते खामगाव तालुक्यातील गारडगाव अशी भीमवंदना यात्रा वन बुलडाणा मिशनच्या वतीने काढण्यात आली. यावेळी यात्रेच्या सुरुवातीला संदीप शेळके बोलत होते. वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा बुलडाणा लोकसभेचे अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांच्या संकल्पनेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आज भीमवंदना यात्रा काढण्यात आली. सकाळी ८ वाजता डॉ. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पातुर्डा यागावातून यात्रेची सुरुवात झाली. त्यांनतर शेगाव शहर, खामगाव शहर या मार्गातून यात्रा उशिरा गारडगाव येथे दाखल होणार आहे. या यात्रेचे ठीक ठिकाणी जल्होषात स्वागत होत असून भीमसैनिकांचा उत्साह पाहायला मिळत आहे. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शोषित, वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. माणसाने जगण्यासाठी खावं आणि समाजासाठी काम करावं असं बाबासाहेब म्हणायचे. बाबासाहेब आयुष्यभर विचारांशी बांधिल राहिले, राजकीय नेता कसा असावा याचं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. समाजाला पुढे घेऊन जातो तो नेता, डॉ.बाबासाहेब समाजाला पुढे घेऊन जाणारे नेते होते. राजकीय व्यवस्थेपासून तुम्ही दूर राहू शकत नाही. देशाचा समाजाचा विकास करायचा असेल तर राजकीय व्यवस्थेचा अविभाज्य घटक होवून तुम्हाला काम करावे लागते. डॉ. बाबासाहेबांनी शोषित वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी चळवळी सोबतच राजकारणाचाही उपयोग केला. राजकारण हे समाज परिवर्तनाचे माध्यम आहे, असे बाबासाहेब म्हणायचे. असे यावेळी संदीप शेळके म्हणाले. बुलडाणा जिल्ह्याचा विकासाचा अनुशेष आपल्याला भरून काढायचा आहे. त्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेल्या विचारांवर मार्गक्रमण करणार असल्याचे संदीप शेळके म्हणाले.

## प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात महायुतीची आघाडी खासदार जाधवांसह मित्र पक्षांनी लावला जोर



जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाची लढत मुरब्बी अनुभवी राजकारणी, निवडणुकीत तरबेज खासदार प्रतापराव जाधव विरुद्ध मोठ्या निवडणुकीचा अजिबात अनुभव नसलेले नेते अशी आहे. यामुळे प्रचाराच्या टप्प्यात खासदार जाधव यांनी चांगलीच आघाडी घेतली आहे. सुनियोजित प्रचारामधून महायुतीचे आमदार, १५ मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचाराला भिडल्याचे चित्र आहे.

मतदारसंघात पंधरा वर्षापासूनचा संपर्क, केलेली कोट्यवधींची विकासकामे, समृद्धी महामार्गासह जिल्ह्यात विणलेले राष्ट्रीय महामार्गाचे जाळे, मार्गी लागलेला जालना खामगाव रेल्वे मार्ग , नदी जोड प्रकल्पाचा पाठपुरावा , लोकसभेत जिल्ह्याशी संबंधित विविध विषय प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या समस्यांवर उठविलेला आवाज ही खासदारांची ठळक उपलब्धी ठरावी. त्यामुळे त्यांना प्रचारात स्वतःविषयी काही सांगायचे काम नाही. प्रचारातही त्यांनी कमालीचा संयम बाळगल्याचे दिसून येत असून प्रतिस्पर्धी उमेदवाराविरुद्ध प्रचारात फारसे बोलणे, त्याच्यावर खालच्या भाषेत बोलण्याचे टाळले आहे.पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांची दहा वर्षातील ऐतिहासिक कामगिरी, जगात भारताचा उंचावलेला मान, चौफेर प्रगती आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वात झालेला राज्याचा चौफेर विकास यावरच जाधवांच्या भाषणाचा रोख राहतो. ही संयमी भाषा व विकासाचा मुद्दे मतदारांना प्रभावित करणारे ठरत आहे. याउलट आघाडी व काही अपक्षांच्या प्रचार केवळ खासदार जाधवांवर खालच्या भाषेत टीका करणे, खिल्ली उडविणे यावर केंद्रित झाला आहे. निवडणुकीत प्रतिस्पर्धी उमेदवार, त्याच्या पक्षाची धोरणे यावर टीका करणे हे स्वाभाविक आहे. मात्र सलग तीस वर्षे लोकप्रतिनिधी असणाऱ्या नेत्याबद्धल पातळी सोडून कमरेखालची भाषा वापरणे हे चुकीचेच अशी उलट प्रतिक्रिया मतदारात उमटत आहे. अगदी ग्रामपंचायत सदस्य पदाची निवडणूक न लढणारे देखील यात आघाडीवर आहे. या सर्वांच्या भाषणाचा रोख खासदार यांच्या विरुद्ध असणे म्हणजे ते प्रचारात आघाडीवर असल्याची मजेदार चर्चा होत आहे. विक्रमी सलग चौथ्या विजयाच्या उंबरठ्यावर असलेल्या धूर्त जाधवांनी अगदी पहिल्या दिवसापासून प्रचाराचे चोख नियोजन केले आहे. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच त्यांनी सहा विधानसभा मतदारसंघात महायुती कार्यकर्ता संवाद मेळावे घेतले. याद्वारे भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी यासह १५ मित्र पक्षांचे नेते व कार्यकर्ते यांना एकत्रित आणून प्रचाराच्या जवाबदारीचे वाटप करण्यात आले . यामुळे अर्ज भरण्याच्या दिवशी झालेली जंगी सभा व रॅली युतीचे शक्तिप्रदर्शन ठरले. सहाही मतदारसंघात युतीचेच उमेदवार असल्याने त्यांचा प्रचार नियोजनबद्ध व प्रभावी ठरला आहे. प्रभावी नेते व पारंपरिक प्रतिस्पर्धी आमदार राजेंद्र शिंगणे सोबत असल्याचा मोठा फायदा खासदाराना होत आहे. स्वतः उमेदवार व समन्वयक आमदार संजय कुटे प्रचारावर लक्ष ठेवून आहे.त्यामुळे पहिल्या टप्प्यातील प्रचारात जाधवांनी आघाडी घेतली असून इतरांच्या तुलनेत ते कितीतरी पुढे असल्याचे दिसून येते.

## भक्ती महामार्ग कृती समिती सदस्य यांनी घेतली महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांची भेट



जनसंचलन/बुलडाणा

सिंदखेडराजा ते शेगाव हो घातलेला भक्ती महामार्ग हा बुलढाणा जिल्ह्यातील ४७ गावातील हजारो एकर शेती घेऊन बनणार भक्ती महामार्ग आहे त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी हे भूमिहीन होणार आहे त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ४७ गावातील शेतकऱ्यांनी या भक्तिमार्गाला विरोध केला आहे या भागातुन शेगाव जाण्यासाठी तिन ते चार रस्ते असताना या महामार्गाची गरज नसताना सुद्धा भक्ती मार्ग होऊ घातला आहे त्यामुळे शेतकऱ्यांची बागायती शेती या रस्त्यामध्ये अधिग्रहीत होणार आहे त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी येणार आहे यापूर्वी सुद्धा प्रत्येक तहसील कार्यालय मधून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवले आहे तसेच बुलढाणा जिल्ह्यातील आमदार यांनी सुद्धा शेतकऱ्याला पाठिंबा म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांना पत्र पाठवून सदर रस्ता रद्द करण्यात यावा म्हणून पत्र पाठवले आहे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आज बुलढाणा येथे आले असता भक्तिमार्ग कृती समितीचे सदस्य समाधान मस्के मधुकर सपकाळ माधव तोरमाळ विश्वंभर जाधव बंडु जाधव निलेश जाधव इत्यादी शेतकरी यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांना सिनखेडराजाचे आमदार माननीय डॉक्टर राजेंद्र शिंगणे तसेच महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील तसेच प्रतापरावजी जाधव यांच्या समवेत भक्ती महामार्ग कृती समितीच्या सदस्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांना निवेदन दिले आहे

# डॉ.बाबासाहेब आंबडेकर जयंती जिल्हयासह बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात साजरी...

## जय भीमच्या जयघोषाने दुमदुमली बुलढाणा नगरी !







जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी भीमगीतांवर नृत्याचा फेर धरला. जिल्हाभरात भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरात जय भीमच्या जयघोषात रॅली काढण्यात आली. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने ११ एप्रिलपासून सुरू असलेल्या विविध कार्यक्रमांचा १४ एप्रिल रोजी समारोप करण्यात आला. बुलढाणा शहराबरोबरच जिल्हाभरात जयंती उत्सवानिमित्त शोभायात्रा व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरासह जिल्ह्यात ११ एप्रिलपासून विविध समाज प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आले १४ एप्रिल रोजी सकाळी स्थानिक गांधी भवनामध्ये भीमपाळणा व मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. सकाळी मोटारसायकल रॅलीमध्येही युवकांचा उत्साह येत होता. दुसरीकडे जिल्ह्यातील गावागावांमध्ये जयंतीनिमित्त सांस्कृतिक, तसेच प्रबोधनपर कार्यक्रमांचे गेल्या काही दिवसांपासून आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा परमोच्च बिंदू म्हणून १४ एप्रिल रोजी सायंकाळी निघालेली शोभायात्रा होती. सर्वत्र ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी, डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई, महिला, पुरुष आणि सर्वत्र निळे झेंडे, तर जय भीमच्या उद्घोषाने एक वेगळेच वातावरण बुलढाणा शहरासह जिल्ह्यात निर्माण झाले होते. जयंती उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन आले दिसून विविध सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल कासारे यांच्या नेतृत्वात १२ ते १४ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ११ एप्रिल रोजी परिवर्तनवादी गीतांचा कार्यक्रम पार पडला, गायक संतोष जोंधळे यांच्या गीतांचा कार्यक्रम पार पडला १२ एप्रिल रोजी प्रा. विठ्ठल कांगणे यांचे व्याख्यान तर १३ एप्रिल रोजी राहुल साठे यांचा प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम पार पडला. १४ एप्रिल रोजी सकाळी भीमपाळणा सादर करण्यात आला. तसेच समता सैनिक दल आणि माजी सैनिकांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. भीमजयंतीचा उत्साह रविवारी पहाटेपासूनच शिगेला पोहचला होता. सकाळी वंदन तर सायंकाळी मिरवणुकीत सहभागी होत आबालवृद्धांसह मातृशक्तीनेही ठेका धरत बाबासाहेबांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित साकारण्यात आलेले देखावे यंदाच्या जयंती उत्सवाचे एक प्रमुख आकर्षण ठरले होते. शहरातील मुख्य मार्गावरून निघून जयस्तंभ चौकात शहरातील विविध भागांतून निघालेल्या या शोभायात्रा एकत्र येत होत्या. जयस्तंभ चौकात प्रत्येक भागात आलेल्या शोभायात्रा एकत्र येत होत्या.

## बुलढाणा शहरात धक्कादायक घटना भीम जयंतीच्या रॅलीत एक तरूणाची हत्या केली...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. शहरात काल भीम जयंती रॅली दरम्यान शहर पोलीस स्टेशनच्या समोर असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळेच्या अंधारलेल्या परिसरात आशुतोष संजय पडघन (२४ वर्षे) याची निर्घृण हत्या करण्यात आली. रात्री १०:३० वाजेच्या दरम्यान झालेल्या या हल्ल्यानंतर पोलिसांनी तगडा बंदोबस्त लावला होता. महत्वाची बाब म्हणजे आशुतोषवर २० ते २२ प्रकारचे गुन्हे आहेत. त्याच्या तडीपारीचाही प्रस्ताव तयार करण्यात




आला होता. पूर्व वैमनस्यातून किंवा रॅलीत उद्भवलेल्या वादावरून आशुतोषला संपविण्यात आल्याचे समजते. जेव्हा त्याच्यावर चाकू हल्ला करण्यात आला तेव्हा त्याला जखमी अवस्थेमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी तो बेशुद्ध अवस्थेतच होता. उपचारादरम्यान त्याचा जीव गेला. हल्ला करणारे अज्ञात आहेत. चिंताजनक बाब म्हणजे काल, मुख्यमंत्री बुलढाणा शहरात होते. त्यांनी तीन ठिकाणी बैठका घेतल्या. त्यामुळे पोलिसांवर मुख्यमंत्री कार्यक्रमाच्या बंदोबस्ताचा ताण प्रचंड असल्यामुळे रॅलीकडे दुर्लक्ष झाले का?? असा सवाल उपस्थित होत आहे. शिवाय काल पहिल्यांदाच रॅलीला रात्री १० ची मर्यादा वाढवून रात्री १२ पर्यंत करण्यात आली होती. आशुतोषवर हल्ला रात्री १०:३० वाजेदरम्यान झाला.

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

जनसंचलन/ सिंदखेडराजा

वडील बाहेरगावी गेल्याचा गैरफायदा घेऊन एका अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याप्रकरणी, तालुक्यातील जागदरी येथील एका २० वर्षीय युवकाविरुद्ध साखरखेर्डा पोलिस ठाण्यात दि. ११ एप्रिल, गुरुवारी गुन्हा दाखल झाला आहे. जागदरी जवळच्याच एका गावातील अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, काही कामानिमित्त ते छत्रपती संभाजीनगर येथे दि. १० एप्रिल, बुधवारी गेलेले होते. त्यावेळी त्यांना त्यांच्या साडूचा भ्रमणध्वनी आला की, त्यांच्या घरात मुकी पत्नी, मुलगी व त्यांची सासू असतांना रात्री ८.३० च्या सुमारास, त्यांची १४ वर्षांची अल्पवयीन मुलगी कुटुंबातील कुणाला काहीही न सांगता घरुन कुठेतरी निघून गेली. यावरुन फिर्यादी ह्यांनी त्यांच्या गावी परत येऊन माहिती घेतली असता जागदरी येथील अंकुश शिवाजी डोईफोडे हा अंदाजे २० वर्षांचा युवक त्यांच्या मुलीच्या मागावर राहत असे. मुलगी पळून गेल्याच्या घटनेनंतर तो सुद्धा त्याच्या गावातून फरार झालेला आहे. त्यामुळे त्यानेच कशाचे तरी आमिष दाखवून आपल्या मुलीला फुस लाऊन पळविल्याचा दाट संशय फिर्यादीत व्यक्त केला आहे. यावरुन साखरखेर्डा पोलिसांनी अंकुश शिवाजी डोईफोडे याच्याविरोधात अप नं. ९५/२०२४ कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी ठाणेदार स्वप्नील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र सानप हे पुढील तपास करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958